३०e

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/२०१५/२०२४
दिनांक : ०४/१०/२०२४

**झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

प्रस्तावना -

स.नं.२११पै, सि.स.नं.३६९४ ते ३६९८, ३७१४, ३७१५, ३१७६, ३७१७, ३७२९ ते ३७३३, ३७४९, ३७५०, ३७८२ ते ३७८४, भिमनगर, पिंपरी वाघेरे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात अधिकार अभिलेखानुसार धारक सदरी पिंपरी रिफ्युजी कॅम्प यांचे नाव दाखल असून मिळकत पत्रिकेवर महाराष्ट्र शासन यांचे नाव दाखल असून तेथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेची बाब कार्यान्वीत आहे.

२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत दि.११/०३/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.१५/०३/२०२४ रोजी डकविण्यात आली असून दि.१६/०३/२०२४ रोजीच्या दैनिक पुण्य नगरी व दैनिक राष्ट्रतेज या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, मंगळवार, मार्च १२, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.०१ व ०२ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसल्याने सक्षम प्राधिकारी तथा सहायक आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन, विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. झोनिपु/०४/कावि/०२/२०२३, दि. ०५/०१/२०२४, अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे, तसेच सक्षम प्राधिकारी क्र. ३, झोपुप्रा, पुणे यांनी देखील दि.११/०१/२०२४ रोजी स्थळपाहणी करून दाखल केलेला स्वतंत्र अहवाल पाहता सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याजोगी परिस्थिती आहे; आणि

४) ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) आणि मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका किंवा इतर हितसंबंधित व्यक्ति यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सदर दि.११/०३/२०२४ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पुर्वसूचना नोटीशीस कोणतही हरकत/सूचना प्राप्त झालेली नाही; आणि

५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने आणि सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत; आणि

६) ज्याअर्थी, सदर योजनेअंतर्गत २०५५.९९ चौ.मी. इतक्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्राकरिता अधिनियमाच्या कलम ३ (क) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण २०५५.९९ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषीत करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई या कार्यालयात अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.२११पै, सि.स.नं.३६९४ ते ३६९८, ३७१४, ३७१५, ३१७६, ३७१७, ३७२९ ते ३७३३, ३७४९, ३७५०, ३७८२ ते ३७८४, भिमनगर, पिंपरी वाघेरे, जि-पुणे.

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव- भिमनगर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. (मोजणी नकाशा क्र.नियमित /हद्द कायम/मो.र.नं. ७१३२/२०२३ दि.२६/०२/२०२३ नुसार) | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (दाखल प्रस्तावानुसार) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.२११पै, सि.स.नं.३६९४ ते ३६९८, ३७१४, ३७१५, ३१७६, ३७१७, ३७२९ ते ३७३३, ३७४९, ३७५०, ३७८२ ते ३७८४ | पिंपरी रिफ्युजी कॅम्प, महाराष्ट्र शासन (७/१२ आणि मिळकतपत्रिकां नुसार) | २०५५.९९ चौ.मी. | उड्डाण पूल., स.नं.२११ पै | लागू रस्ता., स.नं.२११ पै | स.नं.२११ पै., | स.नं.२११ पै., |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- ०४/०८ /२०२४

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

(नीलेश र.गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.